# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

## विभागीय कार्यालय, मुंबई

(स्वायत्त) (ISO 9001:2008)

२ रा मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दू.क्र. : २६४७२१२२/२६४७३२५३ फॅक्स : ९१-०२२-२६४७३२५४

ई-मेल : rbtem@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.com


जा.क्रमांक मरातंशिमं/विकामु/ आवाजाची काळजी /२०२०-२१ / 1347 दिनांक 19 APR 2021

**परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

मंडळाच्या विभागीय कार्यालयाशी संलग्नीत सर्व AICTE मान्यता प्राप्त व औषध निर्माण संस्था

**विषय : - महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, कोल्हापूर यांचे 'राज्यातील शिक्षकांच्या आवाजाची काळजी घेणेबाबत कार्यशाळा ' हा उपक्रम राबविणेबाबत.**

**संदर्भ** :- ०१) सहसंचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १०/एनजीपी/संकीर्ण/२०२१/१६३ दि.१८.०२.२०२१.

०२) मंडळाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-५०/DTE/२०२१/२३३० दिनांक.०६.०४.२०२१

संदर्भ क्र. १ नुसार सहसंचालक, तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, कोल्हापूर यांचे "महाराष्ट्रातील उच्च शिक्षण विभागामध्ये कार्यरत शिक्षकांसाठी त्यांच्या आवाजाचा व्यावसायिक वापर कसा करावा, आवाजाची काळजी घेणेबाबत कार्यशाळा " हा उपक्रम राबविणेबाबत कळविले आहे. संदर्भ क्र.२ नुसार मा. सचिव, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ यांनी याबाबत आपल्या अधिपत्याखालील संस्थांना कळविण्याबाबत निर्देश दिले आहेत

याबाबत आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र कोल्हापूर यांच्याशी संपर्क साधून आपल्या संस्थेतील अधिव्याख्यात्यांसाठी याबाबत ONLINE कार्यशाळाचे आयोजन करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. सोबत यासंबंधीतचे पत्रे जोडली आहेत.

(विजय र. जाधव)
उपसचिव (तां.)
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ
विभागीय कार्यालय मुंबई.
मुंबई.


MITSC
Voice Clinic
Thane
'VOICE CARE WORKSHOP'

भारत आता तरुणांचा देश म्हटला जातो.या तरुणांच्या देशांमध्ये 70 टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या जेव्हा युवा आहे तेव्हा निश्चितच एक आर्थिक महासत्ता होण्याचे स्वप्न प्रत्येक भारतीयाला खुणावत आहे. या युवकांच्या हाताला काम आणि डोक्याला विचार देण्यासाठी सर्वात मोठी आणि महत्वाची जबाबदारी आहे ती आपल्या शिक्षकांच्या वर. "गुरु विना कोण दाखवील वाट" हे संतांचे पाठांतर करत करत मोठी होणारी पिढी करिअरच्या वाटेवर प्रत्येक वेळी मार्गदर्शनासाठी ज्यांच्याकडे भक्तीने पाहते ते म्हणजे आपण सर्व शिक्षक! समाजामध्ये कलाकार , राजकीय नेतृत्व करणारी मंडळी, व्यवसायिक नेतृत्व करणारी मंडळी हे सर्व 'प्रोफेशनल व्हाईस यूजर' म्हणून गणले जातात. पण माझ्यासाठी या सर्वांच्या पेक्षा जास्त महत्वाचा आहे तो आपला शिक्षक आणि या शिक्षकाचा आवाज !

आवाजाची काळजी घेण्यासाठी आणि आवाजाची पोत सुधारण्यासाठी, त्याचबरोबर व्यावसायिक दृष्ट्या अधिकाधिक अचूकपणे आवाजाचा वापर करण्यासाठीची क्षमता प्रत्येक शिक्षकांच्या मध्ये असणे गरजेचे आहे. आणि त्यासाठी आवश्यक आहे ते म्हणजे आवाजच शास्त्र समजून घेणे,आवाज निर्माण कसा होतो हे जाणून घेणे,त्याप्रमाणेच शरीरामध्ये दीर्घकालीन परिणाम करणारे काही आजार होत असताना आवाजाच्या माध्यमातून त्यांची चाहूल सगळ्यात आधी कशा रितीने लागू शकते हे जाणून घेणे , संवादाच्या या सगळ्यात महत्वाच्या माध्यमाची काळजी कशी घेणे ,हे सर्व प्रत्येक शिक्षकाला माहीत असले पाहिजे असे मला वाटते. त्यामुळेच आम्ही घेऊन आलो आहोत आपल्यासाठी , आपल्या सर्व युवा पिढी घडवणाऱ्या शिक्षकांसाठी, प्राध्यापकांसाठी आणि या सर्व शिक्षण व्यवस्थेचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तिमत्वांसाठी एक आवाजाची कार्यशाळा !

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व ऑडिओलॉजस्ट व स्पिच लॅग्वेज पॅथॉलॅाजिस्ट सोनाली लोहार, वॉईस क्लिनिक, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक व प्राध्यापक प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक व प्राध्यापक यांच्या आवाजाची काळजी घेतली जावी व आवाज प्रभावी बनावा' यासाठी 'Voice Care' या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षकांच्या आवाजाचे स्वास्थ्य ही एक अत्यंत महत्वाची पण दुर्लक्षित बाब आहे. जागतिक स्तरावर याबाबत आता जागरूकता येत आहे. त्याचप्रमाणे शिक्षकांचे व्यक्तिमत्वही विद्यार्थ्यांना अनुकरणीय असले पाहिजे आणि आवाज हे व्यक्तिमत्वाचे महत्वाचे अंग आहे. आपण सर्वजण कोल्हापूर, महाराष्ट्रातल्या किंबहुना भारताच्या भवितव्यासाठी महत्वाचे शिल्पकार आहात. यामुळे माझे आपणा सर्वांना आवाहन आहे की, अत्यल्प सेवाशुल्क आकारून घेत असलेल्या या कार्यशाळेमध्ये आपण सर्वांनी सहभागी व्हावे व आपल्या आवाजाचे भतिष्य सुरक्षित करावे. आपल्या कार्यास मनःपूर्वक शुभेच्छा!

AMITSC

Voice Clinic, Thane

सुप्रसिद्ध वॉइस थेरपिस्ट सोनाली लोहार या देशातील काही नामवंत ऑडिओलॉजीस्ट आणि स्पीच लँग्वेज पॅथोलॉजिस्ट पैकी एक आहेत. त्यांचं असं स्वप्न आहे की, त्यांच्या या ज्ञानाचा उपयोग अज्ञानातून पिढी घडवणारे आणि पर्यायाने देशाचे भविष्य घडवणारे शिक्षक यांच्यासाठी झाला पाहिजे. शिक्षकांच्या आवाजाचे उत्तम स्वास्थ्य आणि आवाजामधील झालेली प्रगती हि विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन करण्याच्या प्रवासात अत्यंत उपयुक्त ठरेल, असं त्यांना वाटतं आणि म्हणूनच त्यांनी महाराष्ट्रातील प्रत्येक प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक व प्राध्यापक या सर्वांसाठी या आवाजाची कार्यशाळा ना नफा ना तोटा तत्वावर घ्यावयाच्या योजले आहे. व्यावसायिक तत्वावर म्हणून ज्या कार्यशाळेसाठी 20 ते 25 हजार रुपये खर्च येऊ शकतो ती कार्यशाळा या "आवाज गुरुजनांचा ,वेध देशाच्या भविष्याचा" या उपक्रमांतर्गत केवळ रुपये 1535/- मध्ये उपलब्ध होणार आहे. तरी याचा फायदा करून घ्यावा. आपल्या आवाजाची काळजी ही आपल्या भविष्याची काळजी आहे. आणि आपले भविष्य पर्यायाने युवा पिढी घडवण्यासाठी आणि देशाच्या विकासासाठी अतिशय महत्वाचे आहे .त्यामुळे देशाच्या प्रगतीमध्ये अतिशय महत्वाचा वाटा असणाऱ्या आपणा सर्व गुरुजनांनी या संधीचा फायदा घ्यावा ही मनपूर्वक विनंती!

Voice Clinic
Thane

–सदर उपक्रम प्रत्येक शिक्षकांच्यापर्यंत पोहोचावा, यासाठी विद्यापीठ प्रशासना सहायक शिक्षण संचालकांच्या मदतीने महाविद्यालयापर्यंत उपक्रमाची माहिती पोहचवणे. सदर उपक्रम अपेक्षित परिणाम देत आहे की नाही, यासाठी वेळोवेळी अहवाल मागवुन घेणे व गुणवत्ता वाढीसाठी मार्गदर्शन करणे.

आवश्यक असणारी सर्व तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देणे, आवश्यक असणारे सर्व व्याख्याते, मार्गदर्शक उपलब्ध करून देणे. शिक्षकांच्यापर्यंत माहिती पोहचण्यासाठी नियमित उपक्रमाची दिनदर्शिका उपलब्ध करून देणे, उपक्रम नियमितपणे व सुरळीत सुरू राहण्यासाठी आवश्यक साधनसामग्री उभी करणे.

–संलग्न महाविद्यालयातील सर्व शिक्षकांच्यापर्यंत हा उपक्रम पोहोचवण्यासाठी विद्यापीठ प्रकल्प संचालकांच्या माध्यमातून माहिती पोहोचवणे.

महाविद्यालयातील सर्व शिक्षकांच्यापर्यंत हा उपक्रम पोहोचवण्यासाठी प्रकल्प संचालकांच्या माध्यमातून माहिती पोहोचवणे.

- कालावधी - ३ तास
- नोंदणी शुल्क - १५३५/-
- ऑनलाईन नोंदणी फॉर्म
- शैक्षणिक संस्थेचे ओळखपत्र
- फोटो
- संस्था प्रमुखाचे शिफारस पत्र
- प्रथम नोंदणी प्रथम प्राधान्य

Google Form

https://forms.gle/gxUQbJjLzLW4k9K29

Payment Link

https://gpay.app.goo.gl/pay-rGPYCYuWeDZ

Date Confirmation

Workshop Participation

Certification


Voice Clinic
Thane
Thank You!